# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:06.04.2024** **वार:शनिवार**

---

1. 2024-25 या आर्थिक वर्षातल्या पहिल्या द्वैमासिक पतधोरणात रिझर्व्ह बँकेकडून व्याजदर जैसे थे
2. चालू आर्थिक वर्षात सकल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर 7 टक्के राहण्याचा अंदाज
3. काँग्रेसचा निवडणूक जाहीरनामा प्रकाशित; युवकांना रोजगार, गरीब महिलांना अर्थसहाय्य, आणि जातनिहाय जनगणनेचं आश्वासन
4. राज्यात दुसऱ्या टप्प्यात आठ लोकसभ मतदारसंघात 299 उमेदवारांचे अर्ज ठरले वैध आणि
5. विदर्भात उष्णतेच्या लाटेची तर मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात काही ठिकाणी पावसाची शक्यता

**<u>आरबीआय</u>**

भारतीय रिझर्व्ह बँक लवकरच यूपीआयच्या माध्यमातून बँक खात्यात रोख रक्कम जमा करण्याची सुविधा उपलब्ध करुन देणार आहे. यामुळे बँकांची रोख रक्कम व्यवहार प्रक्रिया अधिक कार्यक्षम होईल आणि ग्राहकांचीही सोय होईल असं बँकेचे गव्हर्नर शक्तीकांत दास यांनी काल मुंबईत सांगितलं. सेन्ट्रल बँक डिजिटल करन्सी अर्थात सीबीडीसी रिटेल ही प्रणाली, बँकांव्यतिरिक्त इतर देयक प्रणालींना वापरण्याची परवानगी देण्यात येत असल्याची माहिती दास यांनी दिली. छोट्या गुंतवणूकदारांना थेट गुंतवणूक करता यावी यासाठी एक मोबाईल ॲप सुरू करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

दरम्यान, काल रिझर्व्ह बँकेनं चालू आर्थिक वर्षातलं पहिलं द्वैमासिक पतधोरण जाहीर केलं. यात बँकेनं रेपो दर आणि इतर बँक दरांमधे कोणतेही बदल केलेले नाहीत. 2024-25 या आर्थिक वर्षात सकल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर 7 टक्के तर ग्राहक किंमत निर्देशांक आधारित महागाई दर साडेचार टक्के असेल असा अंदाज आरबीआयनं व्यक्त केला आहे. मार्चअखेर परकीय चलनसाठा 64 हजार 560 कोटी डॉलर्स या विक्रमी पातळीवर गेल्याची माहिती शक्तीकांत दास यांनी दिली.

**<u>काँग्रेस जाहीरनामा</u>**

काँग्रेस पक्षानं आपला लोकसभा निवडणुकीसाठीचा जाहीरनामा काल प्रकाशित केला. पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, वरीष्ठ नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्या हस्ते नवी दिल्लीत जाहीरनाम्याचं प्रकाशन झालं. गरीब महिलांना वार्षिक 1 लाख रुपये अर्थसहाय्य, महिलांसाठी केंद्र सरकारी नोकऱ्यांमध्ये 50 टक्के आरक्षण, प्रतिदिन किमान 400 रुपये वेतन, शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमतीची हमी आणि जातनिहाय जनगणना करण्याचं आश्वासन या जाहीरनाम्यात देण्यात आलं आहे.

## अर्जछाननी

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात दाखल झालेल्या उमेदवारी अर्जांची काल छाननी झाली. यामध्ये राज्यातील आठ मतदारसंघातील 352 पैकी 299 उमेदवारांचे अर्ज वैध ठरले असल्याची माहिती राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे. बुलडाणा मतदारसंघात 25, अकोल्यामध्ये 17, अमरावतीमध्ये 56, वर्धा इथं 26, यवतमाळ-वाशिममध्ये 20, हिंगोलीत 48, नांदेडमध्ये 66, आणि परभणीमध्ये 41 उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. या टप्प्यात 8 एप्रिलपर्यंत अर्ज मागे घेता येतील आणि 26 एप्रिल रोजी मतदान होईल.

## प्रचार

दरम्यान लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी सध्या प्रचार सुरू आहे. विविध पक्षांचे प्रमुख नेते, प्रचारक ठिकठिकाणी जाहीर सभा, रोड शो तसंच मतदारांच्या गाठीभेटी घेत आहेत. पंतप्रधान येत्या आठ तारखेला चंद्रपूरमध्ये तर 10 तारखेला रामटेकमध्ये प्रचारसभा घेणार आहेत. भाजपाचे ज्येष्ठ नेते नितीन गडकरी यांनी काल गडचिरोली-चिमूर मतदारसंघाचे उमेदवार अशोक नेते यांच्या प्रचारार्थ देसाईगंज आणि चामोर्शी इथं प्रचार सभा घेतली. तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी इंदापूर इथं भाजपाच्या कार्यकर्ता मेळाव्याला सबोधित केलं.

## निवडणूक आयोग बैठक

देशातल्या काही निवडक शहरांचे महापालिका आयुक्त आणि जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना, आपापल्या शहर आणि जिल्ह्यातलं मतदानाचं प्रमाण वाढवण्यासाठी मतदानकेंद्रानुसार कृती आराखडा तयार करण्याचे आदेश मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी दिले आहेत. शहरी आणि ग्रामीण भागासाठी वेगवेगळी धोरणं आखून विशिष्ट व्यक्तीसमुहासाठी गरजेनुसार योजना आखण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. राजीव कुमार यांनी काल या महापालिका आयुक्त आणि जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांची मतदानाची टक्केवारी वाढवण्याबाबत एक बैठक घेतली. या बैठकीत ते बोलत होते. लोकांनी स्वप्रेरणेनं मतदानासाठी बाहेर पडावं यासाठी मोहीम राबवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. राज्यातल्या पुणे, मुंबई, ठाणे आणि नागपूरचे जिल्हा निवडणूक अधिकारी, महापालिका आयुक्त तसंच राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी या बैठकीत सहभागी झाले होते.

## कर्करोग उपचार

कर्करोगावरील CAR-T सेल या अत्याधुनिक उपचार पद्धतीचं उद्घाटन नुकतंच राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते मुंबईत झालं. आतापर्यंत केवळ मोजक्या देशांमधे उपलब्ध असलेली ही उपचार पद्धत भारतात विकसित झाल्यामुळे कमी किमतीत उपलब्ध होईल. देशातल्या या पहिल्या स्वदेशी जनुकीय उपचारांविषयी माहिती देत आहेत टाटा मेमोरियल हॉस्पिटलमधले कर्करोगतज्ज्ञ डॉक्टर हसमुख जैन.......

## यूजीसी टेलिमानस

मानसिक आरोग्यासाठीच्या टेलि मानस या मोफत मदतक्रमांकाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करावी अशा सूचना विद्यापीठ अनुदान आयोग म्हणजेच यूजीसी नं सर्व उच्च शैक्षणिक संस्थांना दिल्या आहेत. यासंदर्भात आयोगानं सर्व विद्यापीठाचे कुलगुरू आणि महाविद्यालयांच्या प्राचार्यांना परिपत्रक पाठवलं आहे. टेलिमानस ही

आरोग्य मंत्रालयाची सुविधा उत्कृष्ट काम करत असून तिचा जनमानसात प्रसार व्हायला पाहिजे असं यूजीसी नं म्हटलं आहे. टेलि मेन्टल हेल्थ अश्युरन्स अँड नेटवर्किंग अर्थात टेलि मानस हा उपक्रम आरोग्य मंत्रालयानं 2022 मधे सुरू केला. या 24 तास काम करणाऱ्या मदत कक्षाद्वारे मानसिक आरोग्याच्या समस्या असणाऱ्या व्यक्तींना सहाय्य केलं जातं.

**मतदान यंत्र सरमिसळ**

पुणे जिल्ह्यातल्या मावळ, पुणे, बारामती आणि शिरुर लोकसभा मतदारसंघातल्या निवडणूकीसाठीच्या 11 हजार 898 मतदान यंत्रांचं काल जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांच्या उपस्थितीत जिल्हास्तरीय रँडमायझेशन, म्हणजेच सरमिसळ प्रकिया करण्यात आली. यावेळी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनाही सरमिसळ प्रक्रियेची माहिती देण्यात आली.

सांगली आणि सातारा जिल्ह्यातही काल विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत मतदान यंत्रांची सरमिसळ करण्यात आली. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर कोणत्याही प्रकारचा आक्षेप नसावा, त्यांचं वितरण पारदर्शक पध्दतीनं व्हावं यासाठी सरमिसळ पध्दत अवलंबण्यात येते.

**स्वच्छता अभियान-परभणी**

6 एप्रिल हा दिवस आंतरराष्ट्रीय क्रीडा विकास आणि शांती दिन म्हणून जगभर साजरा करण्यात येतो. या निमित्त आज परभणी जिल्ह्यात सर्व क्रीडा संघटना, क्रीडा प्रेमी नागरिक, खेळाडू, प्रशिक्षक इथल्या क्रीडा संकुलात स्वच्छता अभियान राबवणार आहेत. यामध्ये सहभागी होण्याचं आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी कविता नावंदे यांनी नागरिकांना केलं आहे.

**अपघात-नाशिक**

नाशिक जिल्ह्यात दिंडोरी रस्त्यावर ढकांबे गावाजवळ झालेल्या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला आणि तीन जण जखमी झाले आहेत. जखमींवर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मोटारीचे चाक फुटल्यामुळे चालकाचे नियंत्रण सुटले आणि ती झाडावर आदळली. त्याचवेळी एक दुचाकीही त्या झाडावर आदळली. यात दुचाकीवरील दोघांचा आणि मोटारमधल्या तिघांचा मृत्यू झाला.

**हवामान**

येत्या 24 तासात कोकणात काही ठिकाणी हवामान दमट आणि उष्ण असेल. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडेल. तर विदर्भात उष्णतेची लाट येण्याची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**